**ई-निविदा सुचना-**

जळगाव महानगर पालिका जळगावच्या हद्यीतील रस्ते, त्या रस्त्यावरील दुभाजकावरील झाडांची / वेलींची लागवड, त्यांचे संगोपण व व्यवस्थापन त्याच बरोबर प्रमुख चौकातील सर्व दुभाजकांना रंगरंगोटी, चौकातील झेब्रा क्रॉसिंग या संदर्भात बांधा, वापरा व ट्रान्सफर करा (B.O.T.) तत्वावर विकासका कडून प्रस्ताव आमंत्रित आहेत. आपले प्रस्ताव सिलबंद पाकिटात सदर जाहिरात प्रसिध्द झाले पासून सात दिवसांचे आत संपुर्ण कार्यशैलीत नकाशे, विस्तृत माहितीसह माननीय आयुक्तांना सादर करावे. सदर प्रस्तावा संदर्भात सविस्तर माहिती आमच्या संकेत स्थळावर आहे.

**१) खालील रस्त्यावरील दुभाजक महानगरपालिकेने तयात केलेली आहेत.**

१) सिंधी कॉलनी चौक ते पिंप्राळा रेल्वेगेट पर्यंतचा दुभाजक.
२) आकाशवाणी चौक ते काव्यरत्नावली चौकापर्यंतचा दुभाजक.
३) काव्यरत्नावली चौक ते महाबळ पर्यंतचा दुभाजक.
४) गिरणा टाकी ते रामानंद नगर पर्यंनचा दुभाजक.
५) शिवाजी नगर रेल्वे ब्रिज ते खडके चाळ पर्यंतचा दुभाजक.
६) आकाशवाणी केंद्र ते रिमांडहोम पर्यंतचा दुभाजक.
७) स्वातंत्र चौक ते संत कंवरराम चौक (पांडे डेअरी) पर्यंतचा दुभाजक.
८) स्वातंत्र चौक ते कोर्ट चौक ते नेहरु चौक ते शास्त्री चौका पर्यंतचा दुभाजक.
९) नेहरुचौक ते रेल्वे स्टेशन पर्यंतचा दुभाजक.
१०) जिल्हा परिषद ते बेंडाळे चौक ते नेल्सन मंडेला चौक पर्यंतचा दुभाजक.

२) सदर दुभाजकामध्ये माती, गाळ, खत-मुत आवश्यकते नुसार टाकणे किंवा आवश्यकता असल्यास बदलविणे.

३) दर्शनी भागात फोनिक्स पाम किंवा फायकर किंवा फॉकटेल पाम किंवा बॉटल पाम किंवा एरिया पाम व सदाफूली, गुडलक, स्नेक प्लांट, बेडरुम प्लांट, कन्हेर, बोगन वेल, गोल्डन दुरांडा, रेड रिप, अस्टर नेत्रा, कॅकटस, तुळशी यापैकी दुभाजकात झाडे वेली लावणे आवश्यक आहे. लावलेल्या झाडांचे संगोपन करणे नियमीत झाडांना बारमाही खत-मुत व पाणी देणे, वेळो वेळी कटींग करणे, स्वच्छता राखणे ही प्रमुख कामे करावयाची आहेत.

४) दरवर्षातून एकदा रंगकाम करणे, झेब्रा क्रॉसिंग पट्टे करणे हे आवश्यक आहे.

५) शहरातील प्रमुख रस्त्यावर छायाचित्रा प्रमाणे दिशादर्शक फलक आपण स्वखर्चाने लावून घ्यावयाचे आहेत.

६) सदर कामासाठी लागणारे पाणी शिवाजी उद्यान येथील भरण्याची व्यवस्था जळगाव महानगर पालिका आपणास स्वखर्चाने करून देईल.

७) सदर कामी लागणारे खत-मुत, माती, रोपे, झाडे-वेली, त्याच्या लागवडीचा खर्च, Transportation, मजूरी, पाण्याचे टँकर, पाणी टाकण्याचा खर्च, डिझेल, वाहनाचे रिपेअर खर्च, मनुष्यबळ खर्च, रंगरंगोटी खर्च हा संपुर्ण विकासकास करावयाचा आहे. या खर्चाचे कोणतीही तोषिश कुठल्याही स्वरूपात जळगाव महानगर पालिका यांना लागता कामा नये.

८) सदर प्रकल्पाचा संपूर्ण कालावधी हा एकूण सलग तीस वर्षासाठी आहे.

९) सदर दुभाजकात स्वत:च्या किंवा इतर जाहिरातदारांच्या जाहिराती (कोणत्याही प्रकारच्या शासनातर्फे प्रवेशित उदा. गुटखा, सिगारेट, दारू, दारूगोळा व राष्ट्रविरोधीय वगळून) इतर जाहिराती लावण्याचा व त्यातून उत्पन्न मिळवण्याचा अधिकार विकासकास राहिल.

१०) जाहिरातीच्या फलकांचा आकार ३ फुट × २ फुट व दोन फलकांमधील सर्वसाधारण अंतर २० ते २५ फुट असे लावण्यात येतील.

११) गेन्ट्रीज (दिशादर्शक फलक) वाहतुकीच्या दिशेने दिशा व त्याची दुस-या बाजूस जाहिरात लावण्याची परवानगी विकासकाला असेल. मात्र वाहतुकीच्या दिशेच्या बाजूने महानगरपालिकेले बोधचिन्ह, स्लोगन व त्या रस्त्यावरील दिशा दर्शक ही रस्त्याची एक बाजू असेल व पलीकडील दुस-याबाजूस विकासक कोणाचीही जाहिरात प्रकाशित करु शकतो.

१२) या संपुर्ण खर्चा प्रित्यर्थ विकासकाने आपले उत्पन्न स्वत:च काढावयाचे आहे. त्या उत्पन्नातून मिळणा-या उत्पन्नाची, नफा नुकसानाची कोणतीही जबाबदारी महानगरकालिकेची राहाणार नाही.

१३) सदर डिव्हायडरच्या जागेवरून उत्पन्नाचे स्त्रोत आपण कसे निर्माण करणार आहात त्याचा आकार विकार पध्दतीचा संदर्भातील तपशीलासह आर्थिक प्रस्ताव आपण महानगरपालिकेला सादर करायचा आहे.

१४) जळगाव महानगरपालिका या संदर्भात कोणतीही जागा भाडे जाहिरात कर किंवा या संदर्भातील इतर कर घेणार नाही.

१५) दिशा दर्शक फलकांची देखरेख करण्याची संपुर्ण जबाबदारी विकासकाची असेल.

१६) दुभाजक सुशोभिकरणाच्या कामात जळगाव महानगरपालिकेचे बोधचिन्ह ठळकपणे अग्रभागी दिसेल त्या प्रमाणे नियोजन करण्यात येईल. अशी काळजी विकासकाने घ्यावयाची आहे. (किमान एक रस्त्यावर दोन असे एकूण वीस सामाजिक संदेशासह.)

१७) चौक सुशोभिकरणा संदर्भात काही एक वाद निर्माण झाल्यास त्या बाबतचा अंतिम निर्णय महानगरपालिकेचा राहिल.

१८) दुभाजक सुशोभिकरणाचे नकाशे तयार करतांना भविष्यात वाहतूकीला कोणत्याही प्रकारचे अडथडे निर्माण होणार नाही याची काळजी विकासकाने घ्यावयाची आहे.

१९) या कामाचा कालावधी तीस वर्षाचा राहील त्यानंतर नुतनीकरणाचा अधिकार महानगरपालिकेचा राहिल व गरज भासल्यास नुतनीकरण दर तीन वर्षांनी करावे लागेल.

२०) सदरच्या दुभाजक सुशोभिकरणाचे काम सहा महिनेचे आत महानगरपालिकेने मान्य केलेल्या डिझाईन नुसार पुर्ण करण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

२१) डिव्हायडर सुशोभिकरणाचे कामे, विकास कामे स्वखर्चाने करावयाचे आहे.

२२) दुभाजक सुशोभिकरणाच्या व त्यानंतर त्यावर होणारी देखभाल दुरूस्तीच्या खर्चाची विकासकाची जबाबदारी राहिल.

२३) दुभाजक सुशोभिकरणा संदर्भात काही एक वाद निर्माण झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय महानगरपालिकेचा राहिल.

२४) अटी शर्तीप्रमाणे काम न झाल्यास सदरचे काम दुस-या विकासकास देण्याचा अधिकार जळगाव महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे.